# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 December 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १० डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- सायबर गुन्हेगारी आणि हवामान बदल ही मानवाधिकारासमोरची नवी आव्हानं– राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरुद्ध विरोधकांचा अविश्वास प्रस्ताव
- राज्य विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं निवडणूक आयोगाकडून स्पष्ट
- मस्साजोगच्या माजी सरपंच हत्या प्रकरणाचे तीव्र पडसाद–एसटी बसची जाळपोळ

आणि

- बांग्लादेशातील हिंदू अत्याचारांच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाचं राज्यभरात आंदोलन

****

सायबर गुन्हेगारी आणि हवामान बदल ही मानवाधिकारासमोरची नवी आव्हानं असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्टीय मानवाधिकार दिवसानिमित्त नवी दिल्लीत विज्ञान भवन इथे आयोजित कार्यक्रमात त्या आज बोलत होत्या. सध्याचं डिजिटल युग हे परिवर्तनकारी आहे, मात्र सायबर गुंडगिरी, डीप फेक, चुकीची माहिती आणि गोपनीयतेसंबंधीची काळजी, या मुद्यांकडेही राष्ट्रपतींनी लक्ष वेधलं.

****

मुंबई राजभवनात राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. निवृत्त न्यायाधीश एन.एच पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या २०२४ स्मरणिकेचं प्रकाशन करण्यात आलं.

****

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित विरोधी आघाडीने अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन सभापती पक्षपात करत असल्याने हा प्रस्ताव मांडल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर म्हटलं आहे. लोकशाहीच्या रक्षणार्थ नाईलाजाने विरोधी आघाडीला हा निर्णय घ्यावा लागल्याचं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे.

****

दरम्यान, संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ होऊन आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत, सभागृहाच्या मर्यादेचं पालन केलं जावं, तसंच जनतेच्या मताचा आदर राखून काम करण्याचं आवाहन केलं.

राज्यसभेतही असंच चित्र दिसून आलं. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंग यांनी दिल्लीतल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित केला. यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप प्रत्यारोप झाल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज तहकूब केलं.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चा आणि वादविवाद यांच्या माध्यमातून संसदेचं कामकाज चालवण्याचं आवाहन संसद सदस्यांना केलं आहे. ते संसद भवन परिसरात पत्रकारांशी बोलत होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नसावा, अशी टीकाही रिजिजू यांनी केली.

त्यापूर्वी आज सकाळी संसद भवन परिसरात विरोधी पक्षाच्या नेत्यांनी, देशातल्या आघाडीच्या उद्योगसमूहानं केलेल्या तथाकथित लाचखोरीच्या मुद्यावरून निदर्शनं केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी, झारखंड मुक्ती मोर्चाच्या महुआ माझी, डी एम के च्या कनिमोळी इत्यादी नेते यात सहभागी झाले होते.

****

राज्य विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं, निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही पाच मतदान केंद्रावरच्या V V PAT चिठ्ठ्या मोजणं आवश्यक आहे. यानुसार २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीवेळी या चिठ्ठ्या मोजण्यात आल्या होत्या, त्यावेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते असं आयोगानं यात म्हटलं आहे. या मोजणीनुसार २८८ मतदारसंघातल्या १ हजार ४४० V V PAT युनिटची मोजणी केली असता, या चिठ्ठ्या आणि मतदान यंत्रात नोंद झालेली एकूण मतं, यामध्ये कुठलीही तफावत आढळून आली नाही, असं आयोगानं जारी केलेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

****

दरम्यान, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर बंदी घालून आगामी सगळ्या निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्याच्या मागणीसाठी रत्नागिरीत काँग्रेस पक्षानं स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

सोलापूर जिल्ह्यातील मारकवाडी इथं आज भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांचा उपस्थितीत इव्हीएम मशीनची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या नेत्यांनी केलेल्या भाषणात ईव्हीएमला विरोध करणारे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह विरोधातील अनेक नेत्यांच्या भूमिकेवर टीका करण्यात आली.

****

माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं आज पहाटे बेंगळुरू इथे त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना काही दिवसांपूर्वी बेंगळुरू इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रुग्णालयातून घरी आल्यानंतर पुन्हा त्यांची प्रकृती खालावली आणि आज पहाटे त्यांचं निधन झालं. कर्नाटकचे मुख्यमंत्री तसंच केंद्रीय मंत्रिमडळात परराष्ट्र मंत्री म्हणून काम पाहिलेले कृष्णा यांनी २००४ ते २००८ दरम्यान महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची जबाबदारी सांभाळली होती.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कृष्णा यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

****

केज इथं घडलेल्या हत्या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटत आहेत. संबंधित मारेकऱ्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरलेल्या संतप्त जमावाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एक बस पेटवून दिली, तर दुसऱ्या बसवर दगडफेक केली. या दुर्घटनेत कोणीही प्रवासी जखमी झाले नसल्याचं वृत्त आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

केज तालुक्यातल्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या झाल्याचं काल निदर्शनास आलं होतं, या प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यात सहभागी प्रत्येकावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केलं आहे.

****

बांग्लादेशातील हिंदू नागरिकांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचारांच्या निषेधार्थ आज जागतिक मानवी हक्क दिनाच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाच्या वतीनं राज्यभरात मोर्चे काढून निदर्शनं करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हिंदू संघटनांच्या सदस्यांसह भारतीय जनता पक्षाचे आमदार अतुल सावे, जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर आणि पदाधिकारी सहभागी झाले होते.

नांदेड इथंही जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. जिल्हाभरात किनवट, मुखेड सह अनेक तालुक्याच्या ठिकाणी मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन देण्यात आलं.

जालना इथंही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जिल्ह्याधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना निवेदन सादर केलं. जिल्ह्यातील परतूर, घनसावंगी, मंठा, जाफ्राबाद, बदनापूर इथंही तहसील कार्यालयावर मोर्चा काढत तहसीलदारांना निवेदन देण्यात आलं.

परभणी इथंही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. शनिवार बाजार ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात हा मोर्चा काढण्यात आला. याला सकल हिंदू समाजाचा चांगला प्रतिसाद मिळाला.

हिंगोलीतही हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला गांधी चौकातून हा महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत आणण्यात आला. यावेळी बांगलादेशचा ध्वज आणि मोहम्मद युनूस यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर यांच्यासह नागरिक आणि विविध पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते.

धाराशिव इथंही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करण्यात आली. शहरातील विविध सामाजिक संघटना तसंच सर्व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री गजानन चौगुले यांनी हिंदू समाजावरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी भारत सरकारनं पुढाकार घ्यावा आणि बांगलादेशातील हिंदूंना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली.

****

सोलापुरातही भाजपाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली सात रस्ता इथल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यापासून मोर्चा काढण्यात आला. राज्यात नाशिक, धुळ्यासह जवळपास सर्वच ठिकाणी मोर्चा काढून निदर्शनं करण्यात आली.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुक्यात आज सकाळी अपघात होऊन चौघांचा मृत्यू झाला तर दोघे जखमी झाले. अंबासाखर कारखान्याजवळ स्विफ्ट कार आणि ट्रकची समोरासमोर धडक होऊन हा अपघात झाला. कारमधील सर्व लातूर जिल्ह्यातल्या रेणापूर तालुक्यातले रहिवासी आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचे सौंदर्यीकरण जिल्ह्यात 'मिशन मोड' वर राबवावं, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी यांची आज जिल्हाधिकाऱ्यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेतली त्यात ते बोलत होते. त्यानुसार येत्या २५ ते ३० डिसेंबर दरम्यान तालुकास्तरावर बैठका घेऊन नियोजन करण्याची सूचना त्यांनी केली.

****

भारतीय लष्कराच्या मुख्यालय दक्षिण कमांडच्या नेतृत्वाखाली आयोजित 'विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉन'मध्ये सहभागी धावपटूंचे आज अहिल्यानगरमध्ये उत्साहाने स्वागत करण्यात आलं. हिवरेबाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते

हिरवा झेंडा दखवून त्यांना पुढे मार्गस्थ करण्यात आलं. या मॅरेथॉनचा जिल्हास्तरीय समारोप अहिल्यानगर किल्ला परिसरात करण्यात आला.

****